**L. A. BILL No. XXI OF 2014.**

A BILL

FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA MEDICAL PRACTITIONERS ACT, 1961.

**सन २०१४ चे विधानसभा विधेयक क्रमांक २१.**

**महाराष्ट्र वैद्यक व्यवसायी अधिनियम, १९६१ यामध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक.**

**(विधानसभेने दिनांक १२ जून २०१४ रोजी संमत केल्याप्रमाणे.)**

१९६१ चा महा. २८.

**ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांकरिता, महाराष्ट्र वैद्यक व्यवसायी अधिनियम, १९६१ यामध्ये आणखी सुधारणा करणे इष्ट आहे; त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या पासष्टाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

**१.** (१) या अधिनियमास, महाराष्ट्र वैद्यक व्यवसायी (सुधारणा) अधिनियम, २०१४ असे म्हणावे.

(२) तो, राज्य शासन, राजपत्रातील अधिसूचनेद्वारे नेमून देईल अशा दिनांकास अंमलात येईल.



(शा.म.मु.) एचबी ७५४–(५४०–६-२०१४)

सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २८ याच्या कलम २५ ची सुधारणा.

१९६१ चा महा. २८.

**२.** महाराष्ट्र वैद्यक व्यवसायी अधिनियम, १९६१ याच्या कलम २५ मधील, खंड (तीन) नंतर, पुढील खंड दाखल करण्यात येतील :—

"(चार) अनुसूचीच्या भाग अ, अ-१, ब किंवा ड मध्ये नमूद केलेल्या अर्हता धारण करणाऱ्या, भारतीय वैद्यक पद्धतीमधील नोंदणीकृत व्यवसायींना, ज्याकरिता त्यांची नोंदणी करण्यात आली असेल अशा भारतीय वैद्यक पद्धतीबरोबरच, आधुनिक शास्त्रीय वैद्यक पद्धत म्हणून ओळखल्या जाणाऱ्या विषमचिकित्सा पद्धतीचा, त्या पद्धतीमधून त्यांनी घेतलेल्या प्रशिक्षणाच्या व्याप्तीपुरता, व्यवसाय करण्याचा विशेषाधिकार असेल.

(पाच) अनुसूचीच्या भाग अ, अ-१, ब किंवा ड मध्ये नमूद केलेल्या अर्हता धारण करणारे आणि कलम १७ अन्वये तयार केलेल्या नोंदवहीत ज्याची अतिरिक्त अर्हता म्हणून नोंद करण्यात आली असेल अशी पदव्युत्तर अर्हता धारण करणारे भारतीय वैद्यक पद्धतीमधील नोंदणीकृत व्यवसायी, पदव्युत्तर शिक्षणाच्या कालावधीत त्या पद्धतीतून त्यांनी घेतलेल्या प्रशिक्षणाच्या व्याप्तीपुरता, नवीनतम ज्ञान, कौशल्य व तंत्रशास्त्र-विषयक प्रगतीचा वापर करण्यास व व्यवसाय करण्यास पात्र असतील.".